आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीची लगबग सुरु, विविध पक्षांच्या उमेदवारांकडून शक्तिप्रदर्शन करीत अर्ज दाखल
- रस्ते बांधणीसाठीच्या आधुनिक पद्धती मांडण्यासाठी सरकार अभियंत्यांना प्रोत्साहन देत आहे, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्र्यांचं प्रतिपादन
- चीन किंवा जपानपेक्षा भारतात शिक्षणासाठी जास्त खर्च करण्यात येतो असा युनेस्कोच्या पाहणीचा निष्कर्ष

  **आणि**
- भारत-न्यूझीलंड दुसऱ्या क्रिकेट कसोटीला पुण्यात प्रारंभ

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. विविध पक्षांनी उमेदवार याद्या जाहीर केल्या असून, काही उमेदवारांनी अर्ज भरायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. पालघर विधानसभा मतदारसंघातून नरेश कोरडा आणि विक्रमगडमधून सचिन सिंगडा यांना मनसेने उमेदवारी दिली आहे.

महाविकास आघाडीच्या वतीने **इंदापूर** विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. **येवल्या**मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ, **आंबेगाव**मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे पाटील, **शिर्डी** इथून भाजपचे राधाकृष्ण विखे पाटील, **मुंबई**त **मलबार हिल** इथून भाजपचे मंगलप्रभात

लोढा तर **कांदिवली पूर्व** मधून भाजपचे अतुल भातखळकर हे देखील आज अर्ज दाखल करत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे आज **वरळी** मतदार संघातून अर्ज दाखल करत आहेत. **कोथरुड**मधून भाजपचे चंद्रकांत पाटील यांनी तर **मुलुंड** मतदार संघात भाजपाचे मिहिर कोटेचा यांनी अर्ज दाखल केला. मनसेचे **ठाणे** मतदारसंघातले उमेदवार अविनाश जाधव यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. बीड जिल्ह्यात **परळी** विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार धनंजय मुंडे यांनी तर **कळमनुरी** इथून शिवसेनेचे संतोष बांगर यांनी महायुतीकडून अर्ज दाखल केला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात **कुडाळ** विधानसभा मतदारसंघातून आज आमदार **वैभव नाईक** यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांची कुडाळ शहरामध्ये जाहीर सभा झाली. या सभेला महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यातल्या **दक्षिण सोलापूर** विधानसभा मतदारसंघासाठी भाजपाचे उमेदवार माजी मंत्री **सुभाष देशमुख** यांनी आज दुपारी अर्ज दाखल केला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार आणि इतर नेते उपस्थित होते. मुंबईत **विलेपार्ले** विधानसभा मतदार संघातले भाजप उमेदवार **पराग अळवणी** यांनी आमदार प्रविण दरेकर यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. कांदिवली विधानसभा मतदार संघातून भाजप उमेदवार अतुल भातखळकर यांनी माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत आहे. निवडणूक कार्यालयांच्या स्वीप पथकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पथकांमार्फतही येत्या 20 नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन करण्यात येत आहे.नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे उद्यानं, बाजारपेठा, शैक्षणिक संस्था इत्यादी ठिकाणी मतदार जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगानं विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये जलजागृतीसाठी मुंबई विद्यापीठानं पुढाकार घेतला आहे. मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागामार्फत (DLLE) अनेक उपक्रम हाती घेण्यात आले असून विभागामार्फत विविध महाविद्यालयांच्या सहकार्यानं निवडणूक साक्षरता उपक्रमांची मालिका सुरु करण्यात आली आहे. त्यात ऑनलाईन मतदार नोंदणी, मतदार जागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण, इलेक्टोरल लिटरसी क्लबची स्थापना, मतदानाची शपथ आणि ईव्हीएम व्हीव्हीपॅटचे प्रात्यक्षिक आणि मतदान जनजागृतीसाठी व्यापक उपक्रमांचा यात समावेश आहे.

प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांनी विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन केल....

**होल्ड--बाईट- प्रशांत दामले**

**<><><><><>**

जळगाव जिल्ह्यातल्या कसोदा गावाजवळ पोलिसांनी काल रात्री दीड कोटी ४५ लाख रुपयांची रोख रक्कम जप्त केली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस काल रात्री एरंडोल विधानसभा परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी एका

कारची तपासणी केली असता त्यात हे पैसे आढळून आले. ही रक्कम कोणाची आहे याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान अंमळनेर तालुक्यात एका कारमधून १६ लाख ३८ हजार रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **मुंबई पश्चिम उपनगरातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

रस्ते सुरक्षेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेसारख्या सर्व प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सरकार करत आहे, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. नवी दिल्ली इथं १२ व्या ट्रॅफिक इन्फ्राटेक एक्स्पोला ते संबोधित करत होते. रस्ते बांधणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणं आवश्यक आहे हे त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. रस्ते बांधणीसाठीच्या आधुनिक पद्धती मांडण्यासाठी सरकार अभियंत्यांना प्रोत्साहन देत आहे, असंही गडकरी म्हणाले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरण बांधत असलेल्या रस्त्यांमुळे अपघातांचं प्रमाण कमी होईल, अपघाताचं प्रमाण कमी करण्यासाठी सरकार खासगी क्षेत्रातल्या तज्ज्ञांची नियुक्ती करत आहे, असं गडकरी यांनी सांगितलं.  रस्त्याची गुणवत्ता

राखणारी, कायद्याची अंमलबजावणी करणारी आणि पथनाक्यांचं व्यवस्थापन करणारी प्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न हे तज्ज्ञ करतील असं गडकरी म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ तारखेला मन की बात या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा ११५ वा भाग आहे. श्रोते येत्या २५ तारखेपर्यंत टोल फ्री क्रमांक, नमो ॲप किंवा मायजीओव्ही ओपन फोरम वरून आपली मतं, सूचना पाठवू शकतात.

**<><><><><>**

चीन किंवा जपानपेक्षा भारतात शिक्षणासाठी जास्त खर्च करण्यात येतो असं युनेस्कोच्या पाहणीत आढळलं आहे. भारतात शिक्षणावरचा खासगी आणि सरकारी खर्च आशियातल्या इतर देशांपेक्षा जास्त असल्याचं युनेस्कोच्या अहवालात म्हटलं आहे. २०१५ ते २०२४ या काळात शिक्षणाला प्रोत्साहन देण्याकरता स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक १ दशांश टक्के ते ४ पूर्णांक ६ दशांश टक्के खर्च भारतात करण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्रांनी २०३० पर्यंतच्या कालावधीसाठी निश्चित केलेल्या उद्दिष्टांमधे म्हटलंय की राष्ट्राच्या जीडीपीच्या ४ ते ६ टक्के तरतूद शिक्षणासाठी असावी.

**<><><><><>**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित प्रवीण लोणकरला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. प्रवीणचा लोणकरचा भाऊ शुभम हा अद्यापही फरार असून पोलीस त्याच्या शोधात

आहेत. शुभमच्या संपर्कात असलेल्या चौघांना मुंबई पोलिसांनी काल चौकशीसाठी ताब्यात घेतलं होतं, तर पुण्यातून आणखी तिघांना काल रात्री ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

न्यूझीलंड विरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याला आज पुणे इथं सुरुवात झाली. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीला उतरलेल्या कर्णधार टॉम लॅथम आणि डेव्हॉन कॉनवे यांनी पहिल्या विकेटसाठी ३२ धावांची भागीदारी केली. आर. अश्विन याने लॅथमला बाद केल्यानंतर फलंदाजीला आलेल्या विल यंग यालाही अवघ्या १८ धावांवर बाद केलं. त्यानंतर कॉनवे अवघ्या ७६ धावांवर झेलबाद झाला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ६ बाद २३२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन सामन्याच्या मालिकेतला पहिला एकदिवसीय सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरू झाला आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ बाद ११२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

अल्बानियात तिराना इथं सुरू असलेल्या २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या विश्वजित रामचंद्र मोरे या कुस्तीगीरानं कांस्यपदक पटकावलं. त्यानं पुरुषांच्या ५५ किलो ग्रीको रोमन गटात ॲडम उलबाशेव्हचा १४-१० असा पराभव केला. या स्पर्धेतलं भारताचं हे पहिलचं पदक आहे.

**<><><><><>**

व्हिएन्ना ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू एबडन या जोडीचा सामना ब्रिटनचा नील स्कुपस्की आणि न्यूझीलंडच्या मिशेल व्हिनस या जोडीशी आज होणार आहे. सायंकाळी चार वाजून ५० मिनिटांनी सामन्याला सुरुवात होईल.

याआधी झालेल्या सामन्यात रोहन बोपन्ना आणि मॅथ्यू एबडन या जोडीने रॉबीन हास आणि अलेक्झांडर झ्वेरव यांचा २-६, ७-५, १०-५ असा पराभव केला होता.